शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## आरोग्य धोक्यात, माफिया मोकाट

### गुटखा माफियांवर शासनाचा बोजड कायदा, लाल रंगाचे साम्राज्य अजूनही फुलतंय!

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यात गुटखा बंदी फक्त कागदोपत्री आहे. शासनाचा कायदा आहे, पण माफियांची सत्ता जास्त आहे. जिल्ह्यातील सर्वच भागात गुटख्याचा धंदा उघडपणे सुरू आहे. शासनाने दशकभरापूर्वी गुटखा बंद असा मोठा फतवा काढला. कागदावर गुटखा विक्री संपली, पण प्रत्यक्षात लाल रंगाच्या थुंकीचे डाग आजही रस्त्यांच्या, भिंतींच्या, सरकारी दवाखान्यांच्या, खाजगी कॉम्पलेक्स व शाळांच्या कोपऱ्यात 'सजावटीच्या फुलांची माळ' घालून बसलेले आहेत. पण प्रशासनाचे डाग पडद्यामागे लपून बसतात.

कर्करोगासारखे आजार गुटख्यामुळे झपाट्याने वाढत आहेत. गावोगावी रुग्णालयांमध्ये रुग्णांची संख्या वाढतेय, पण सरकारची यंत्रणा बेफिकीर आहे. शासनाच्या नावापुरत्या बंदीमुळे गुटखा माफिया दिवसाढवळ्या दुकाने चालवतात. जनता मरते, पण गुटखा माफिया पैशात लोळतो.

गुटख्याचा पैसा थेट पोलीस ठाण्यातून राजकीय मंडळींच्या खिशात जातो, अशी चर्चा सर्वत्र आहे. ज्या अधिकाऱ्यांनी जनतेसाठी कारवाई करायची, तेच हात आखडता घेतात. मिळालं गुटख्याचं पॅकेट, आणि बंदीचा फाइल ताबडतोब थंडगार! - अशी व्यंगात्मक चर्चा होत आहे.

जनतेची मागणी सरळ आहे, गुटखा विक्रेत्यांना आश्रय देणाऱ्या पोलीस व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा., प्रत्येक गावात विशेष पथक नेऊन धाडसी छापे मारा., जप्त गुटखा नासधूस करा आणि त्याचा पारदर्शक अहवाल द्या., गुटख्याचे दुष्परिणाम दाखवणारी जनजागृती मोहीम हवी.

**लालाचा लाल सवाल**

जालना शहरातील सतिश उर्फ लाला या माफियाचे नाव सर्वश्रुत आहे. त्याच्या गाड्या पकडल्या, माल जप्त झाला, तरी त्याचा धंदा थांबत नाही. प्रशासनाची कारवाई म्हणजे पावसातल्या छत्रीवरचं पाणी - दिसतं मोठं, पण थेंब खाली गळतातच. आजवर कुणालाच लालाचा धंदा बंद करण्याची धमक दाखवता आलेली नाही. सतिश उर्फ लाला हा गुटखा माफिया इतका प्रभावी झालाय की आता लोक त्याला लाल रंगाचा राजा म्हणतात.

**सरकारसमोर दोन पर्याय**

लाला व गुटखा माफियांवर कडक कारवाई करून बंदी प्रत्यक्षात आणा. किंवा परवाना द्या आणि जनतेची थट्टा थांबवा.

अन्यथा, गुटखा माफियांच्या लाल थुंकीसोबत शासनाच्या बंदीचाही फुगा रस्त्यावर पडलेला दिसेल. भावी पिढीला वाचवायचे असेल तर कडक कारवाई हा एकमेव मार्ग आहे. अन्यथा जालना जिल्ह्याचे नाव गुटखा माफियांच्या साम्राज्यामुळे काळ्या यादीतच राहील.

**अंमलबजावणीत त्रुटी...**

कायद्याने बंदी असली तरी गुपचूप गुटखा विक्री सुरू असते. काळ्या बाजारात किंवा सीमेजवळून गुटखा आणून विकला जातो.

व्यसनाधीन लोक पर्याय शोधतात, काही लोक गुटख्याऐवजी सुगंधी सुपारी, खैनी किंवा इतर तंबाखूजन्य पदार्थांकडे वळतात. गुटखा विक्रीतून येणारा कर महसूल कमी झाल्याने सरकारला तोटा सहन करावा लागतो.

थोडक्यात सांगायचं तर, गुटखा बंदी ही आरोग्य व समाजाच्या दृष्टीने अत्यंत गरजेची आहे, पण तिची खरी परिणामकारकता कडक अंमलबजावणीवर आणि जनजागृतीवर अवलंबून आहे.




युवा आदर्श

**दुर्गा उत्सव ...**

येई मोठे सेलिब्रिटी
नवरात्री महोत्सवात
यंदा लेसण गाजणारं
स्वयंसेवक उत्साहात
तिकीट विक्री रंगली
खपतात हातो हात
होर्डिंग्ज झळकलेले
वाह भय्या क्या बात
नेते मंडळी व्यग्र सारे
मुलाखती गाजतात
चढाओढ ओढाताण
पोळी पहा भाजतात
डिजे वाजे ढणाढणा
धस्स होई काळजात
पोरी फिरे एकट्याने
आई बाप काळजीत
बळजबरी वर्गवर्गणी
पावत्या त्या फाडतात
गुंडगिरी उन्मत्त अति
गोर गरिबां नाडतात
दुर्गामाता गं अंधारात
सेलिब्रिटी प्रकाशात
नेते मंडळी आनंदात
किर्ती जा आकाशात
आपणचं जबाबदार
घडता काही आक्रीत
आई तूच सावरे बाई
करे चालले विपरीत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

जालना तालूक्यातील रोहनवाडी आणि पानशेंद्रा भागात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त भागाचा दौरा

## या नैसर्गिक संकटात शासन खंबीरपणे पाठीशी

### उद्योग मंत्री उदय सामंत यांचे शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदतीचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने झाल्याने जिल्ह्यातील अनेक भागातील शेतपिकांचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर आज राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री श्री. उदय सामंत यांनी आज जालना तालूक्यातील रोहनवाडी आणि पानशेंद्रा या गावात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी केली.

यावेळी श्री. सामंत यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधुन, या नैसर्गिक संकटाच्या वेळी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन, बाधीत शेतकऱ्यांना शासन सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे व त्यांना न्याय मिळवून देण्याची आमची जबाबदारी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. कृषिमंत्र्यांनी सगळ्या उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पंचनामे करुन, शासनामार्फत नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत पोहोचविण्यात येणार असल्याचेही श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर, उपविभागीय अधिकारी श्री. दौड, तहसिलदार श्रीमती छाया पवार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह रोहनवाडी आणि पानशेंद्रा या गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या.



## आजच्या तरुणाला नामस्मरणाची गरज - हभप पूजाताई कुहिरे



**परतूर । प्रतिनिधी -** आजच्या तरुण पिढीला जेवढी मोबाईल गरज वाटते तेवढीच नामस्मरणाची अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन हभप पूजाताई कुहिरे यांनी केले आहे.

त्या नवरात्र उत्सवानिमित्त डोल्हारा येथे राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेतील ह.भ.प. पूजाताई कुहिरे यांच्या सुमधुर वाणीतून हरी कीर्तन सोहळा गुरुवारी रात्री संपन्न झाला.

परतूर येथील राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेच्या हभप. पूजाताई कुहिरे यांनी यावेळी बोलताना तरुण पिढीला अत्यंत मोलाचा आणि विचार करायला लावणारा संदेश दिला. त्यांनी तरुण वयाचे महत्त्व सांगत, लोकांना संसाराच्या चिंतांमध्ये अधिक वेळ न घालवण्याचा आणि त्याऐवजी नामस्मरणावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला.

त्या म्हणाल्या, आजच्या तरुणाला विशेषतः नामस्मरणाची गरज आहे. परमार्थ प्राप्तीसाठी केवळ देवाला शरीराची इंद्रिये अर्पण करून चालणार नाही, तर सर्वात महत्त्वाचे आहे. ते मन अर्पण करणे. मन शुद्ध आणि एकाग्र असेल तरच खरा परमार्थ साधता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

कीर्तनप्रसंगी निरूपण करताना त्यांनी एक महत्त्वपूर्ण दृष्टांत दिला. त्या म्हणाल्या, दगडाचे घाव सोसल्याशिवाय देवाला देवपण येत नाही. या उदाहरणातून त्यांनी सूचित केले की, आयुष्यात आलेल्या अडचणी, कष्ट आणि त्याग यातूनच मनुष्य आध्यात्मिक आणि नैतिक दृष्ट्या अधिक म जबूत आणि उन्नत बनतो. जसे म ूर्ती घडवण्यासाठी दगडाला छेनी-हातोडीचे घाव सोसावे लागतात, तसेच जीवनातही परमार्थ साधण्यासाठी त्याग आणि परिश्रम ाची तयारी ठेवावी लागते. ह.भ.प. पूजाताई कुहिरे पान २ वर

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त शेतपिकांची केली पाहणी

## नुकसानीनुसार योग्य पंचनामे करण्याच्या प्रशासनाला मंत्री लोढा यांच्या सुचना



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने झाल्याने जिल्ह्यातील अनेक भागातील शेतपिकांचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज बदनापूर तालूक्यातील शेलगाव या गावात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी केली. यावेळी श्री. लोढा म्हणाले की, शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने झालेल्या नुकसानीनुसार योग्य पंचनामे करावे. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत मदत देण्यात येणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन, त्यांनी काळजी करू नये. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहचविण्यात येणार असल्याचेही श्री. लोढा यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार नारायण कुचे, उपविभागीय अधिकारी श्री. दौड, तहसिलदार, श्री. हेमंत तायडे, सरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह शेलगाव येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## संपादकीय

# ‘गुगल’ गुरू

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे. अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

**पान १ वरुन**

### आजच्या तरुणाला ...

यांच्या या ओजस्वी आणि विचारांना नवी दिशा देणाऱ्या कीर्तनाने डोल्हारा येथील वातावरण भक्तीमय झाले होते. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांनी त्यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.आणि त्यांना श्रवणीय असा परमार्थिक अनुभव मिळाला त्यांच्या कीर्तनाला डोल्हारा येथील महिला पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवा भाऊ...हे राज्य बळीराजाचे की बळी घेणाऱ्यांचे...?

राज्यातील शेती ही पूर्णपणे निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. पाऊस पडला तर पिके उभी राहतात आणि पाऊस लांबला, थांबला किंवा अति झाला तर पिकांसोबत शेतकरीही कोसळतो. यंदा मराठवाड्यातील परिस्थिती ही 'ओल्या दुष्काळा'ची आहे. पावसाचा अतिरेक झाला आहे. पिकांना योग्य तऱ्हेने वाढीची संधीच मिळाली नाही, जमिनीत पाणी साचले, मुळे कुजली. उभी शेती डोळ्यांसमोर वाहून गेली. अशा वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक विमा हा आधारस्तंभ ठरायला हवा होता. मात्र अलीकडे एनडीआरएफ (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी) चे बदललेले निकष इतके किचकट आहेत की, शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिसकावून घेतल्यासारखे झाले आहे. या निकषांनुसार भरपाईची रक्कम ही थेट पीक कापणी प्रयोगावर अवलंबून राहणार आहे. म्हणजेच शेतात किती नुकसान झाले, किती पिके वाहून गेली, जमिनीवर उरलेच नाहीत, याची तातडीने दखल घेतली जाणार नाही. आधी कापणी होईल, मग कापणी अहवाल येईल, मग आकडेवारी तपासली जाईल, त्यानंतरच भरपाई मिळेल. प्रत्यक्षात बळीराजा त्या वेळेपर्यंत जगणार कसा, घरखर्च करणार कसा, कर्जफेड करणार कशी, याचा विचारच केलेला नाही. जुन्या योजनेनुसार स्थानिक आपत्ती, पिके न उगवणे, अतिवृष्टी, गारपीट, कापणीनंतरचे उत्पादन संकट या सगळ्यांवर भरपाई मिळत होती. किमान ३३ टक्के नुकसान हे निकष पुरे होताच शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा होत असे. आता मात्र फक्त अंतिम कापणी प्रयोगावर भर राहणार असल्याने अतिवृष्टीसारख्या तातडीच्या संकटात विमा कंपन्या हात झटकू शकतात. म्हणजेच, जुन्या योजनेनुसार यावेळच्या अतिवृष्टीत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात भरपाई मिळाली असती. पण आता ते सर्वस्वी एनडीआरएफच्या निकषांवर सोपवले गेले आहे. म्हणजेच केंद्राच्या आपत्ती निधीतून किती मिळेल, त्यासाठी किती प्रक्रिया होईल, याच्यावर बळीराजाचे भविष्य टांगले गेले आहे.




विमा कंपन्यांनी मात्र या सगळ्यातून स्वतःला सोडवून घेतले आहे. हा अन्यायकारक बदल शेतकऱ्यांच्या छाताडावर पाय देऊन केलेला आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी शेतांच्या बांधांवर जाऊन पाहणी केली, शेतकऱ्यांचे ओले डोळे त्यांनी पाहिले, दुर्दैवी हकीकती ऐकल्या. तरीही प्रत्यक्ष मदतीत पीक विम्याच्या नावाखाली कंपन्यांच्या तिजोऱ्या भरून शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने घरी पाठवणे हा फार मोठा नतद्रष्टपणा आहे. ओला दुष्काळ झाल्यावर बियाणे पुन्हा टाकता येत नाही, कारण हंगाम संपलेला असतो. खते, मजुरी, औषधे, पाणी व्यवस्थापन या सगळ्यांवर आधीच कर्ज काढलेले असते. पण विमा नाकारल्यामुळे शेतकरी हताश होतो. बँका आणि सावकार कर्जफेडीसाठी तगादा लावतात, घरखर्चाचा ताळमेळ लागत नाही, मुलांच्या शिक्षणावर गदा येते. ओल्या दुष्काळाचा परिणाम हा केवळ शेतातच नाही, तर थेट घराघरात पोहोचतो. शेतकरी शेतकरी कुटुंब मानसिकरित्या खचून जाते. विमा कंपन्यांचे गणित फारच वेगळे आहे. शेतकऱ्यांनी दिलेला हप्ता आणि सरकारकडून मिळणारी सबसिडी ही कंपन्यांसाठी मोठा महसूल ठरतो. प्रत्यक्ष नुकसानभरपाई मात्र फार कमी प्रमाणात दिली जाते. काही वर्षे तर अशा कंपन्यांना हजारो कोटींचा नफा झाल्याची आकडेवारी आहे. म्हणजे, शेतकऱ्यांच्या अश्रूंमधूनच या कंपन्या आपली तिजोरी भरत आहेत. हा प्रकार थांबवायचा असेल तर सरकारने पुढाकार घेऊन कठोर निर्णय घ्यायला हवेत. प्रश्न असा आहे की सरकार कोणाच्या बाजूने उभे आहे? शेतकऱ्यांच्या की कंपन्यांच्या ? सरकारने कंपन्यांना कडक अटी लावायला हव्यात.

नुकसानभरपाई ठरवताना गावोगावच्या प्रत्यक्ष पंचनाम्याला प्राधान्य द्यावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ठीक आहे, पण तो शेतकऱ्यांच्या सोयीसाठी असावा, शिक्षा करण्यासाठी नव्हे. उदाहरणार्थ, मोबाईलवर फोटो अपलोड करता आला नाही म्हणून शेतकऱ्याला विमा नाकारणे ही क्रूरता आहे. त्याऐवजी महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी थेट नोंद करावी अशी सक्ती करायला हवी. सरकारकडे आणखी एक पर्याय आहे. विमा कंपन्यांच्या हातात शेतकऱ्यांचे भविष्य सोडण्यापेक्षा 'राज्यस्तरीय पीक आपत्ती निधी' निर्माण करणे. या निधीतून थेट नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात द्यावी. जर सरकारला वाटत असेल की खासगी कंपन्यांकडूनच विमा घ्यायचा, तर मग त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. वेळेत नुकसानभरपाई न दिल्यास कंपन्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. शेतकऱ्यांचा विम्यावर विश्वास राहिला नाही तर ही योजना कोसळेल. जेव्हा शेतकरी विम्यातून बाहेर पडतो, तेव्हा तो पूर्णपणे निसर्गाच्या दयेवर राहतो. आधीच हवामान बदलामुळे पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे, अनिश्चितता वाढली आहे. अशा वेळी सरकारची जबाबदारी आणखी वाढते. पण आज उलटे चित्र दिसते. कंपन्या सुखावतात आणि शेतकरी दुखावतो. या सगळ्या गोंधळात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, 'शेतकऱ्याला किती मिळाले' हा नाही, तर 'त्याच्या हक्काचा आधार किती हिरावून घेतला' हा आहे. सरकारकडून वारंवार 'हे राज्य बळीराजाचे आहे' अशा घोषणा केल्या जातात. प्रत्यक्षात हे राज्य बळी घेणाऱ्यांचेच असल्याचा प्रत्यय वारंवार येतो. पीक विमा म्हणजे शेतकऱ्याच्या आयुष्याची किमान हमी. ती हमीच जर कागदी कारवाईत गाडून टाकली तर ते आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना जिवंत गाडण्यासारखे आहे. म्हणूनच आता शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहणे ही केवळ आर्थिक गरज नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे आता शहरी भागातील लोकांनीही शेतकऱ्यांसाठी आवाज उठवण्याची गरज आहे. कारण शहरात येणारे धान्य, भाजीपाला हा आभाळातून पडत नाही, शेतकऱ्यांच्या शेतात पिकत असतो.

# मायबाप सरकार शेतकऱ्यांनी जगावे की मरावे?

आज जवळपास दहा वर्ष झाले पाऊस पुरेसा व योग्य वेळी पडत नाही. निसर्गाचे ऋतुचक्र पूर्णपणे बदलून गेले आहे. पाऊस पडला की नुसता कहर करून टाकतो. पुराने, वादळ वाऱ्याने व गारपिटीने थैमान घातले जाते. म्हणजे हा अवकाळी पाऊस दळणवळण व वाहतूक व्यवस्था ठप्प करून टाकतो. शेतकऱ्यांना, कामगारांना व कर्मचाऱ्यांना घरी बसवतो. शेतातील कापूस, सोयाबीन व इतर धान्य भुईसपाट करून टाकतो. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेने व दुष्कृत्यामुळे हिरावून नेला जातो. मृग नक्षत्रात बरोबर योग्यवेळी पाऊस पडल्यावर शेतकरी शेतात पेरणी करतात परंतु कधीकधी पाऊस शेतकऱ्यांना चांगला साथ देतो तर कधीकधी चांगले आलेले पीक पावसाच्या अतिवृष्टीमुळे व गारपिटीमुळे भुईसपाट व जमीन दोस्त होते. शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन व त्यांची आर्थिक उलाढाल ही शेतीवर अवलंबून असते. शेतीने चांगली साथ दिली आणि शेतात भरभरून पीक आले तरच शेतकऱ्यांची चांगली भरभराट होते. शेतकऱ्यांना आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदी व सुखी होतो. परंतु शेतीने जर निसर्गाच्या अवक्रपेमुळे व दुष्कृत्यामुळे शेतकऱ्यांना दगा दिला आणि शेतीत डौलाने आलेले चांगले पीक व धान्य हिरावून नेले तर शेतकरी पूर्णपणे हतबल होतो व खचून जाऊन टोकाचा निर्णय घेतो. आणि गळफास लावून किंवा विष प्राशन करून स्वतःचे जीवन संपवतो. कारण त्याला घर प्रपंच चालवणे, मुलाबाळांचे शिक्षण व सावकाराचे वाढते कर्ज पाहून ते असे टोकाचे निर्णय घेतात. सध्या शेतकरी पूर्णतः शेतीवर अवलंबून असल्यामुळे जवळपास दहा वर्षापासून शेतीचे ऋतुचक्र पूर्णपणे बदलून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर वाईट दिवस आले आहेत. आज जर आपण शेतकऱ्यांचा विचार केला तर महाराष्ट्रात म्हणा अथवा देशात म्हणा सर्वाधिक आत्महत्या या शेतकऱ्यांच्या होत आहेत. याला नैसर्गिक ऋतुचक्र, आपण स्वतः आणि शासन सर्वस्वी जबाबदार आहे. माणूस स्वतः झाडांची बेसुमार कत्तल करून ऋतुचक्र बिघडवत आहे. अलीकडे दहा वर्षांत झाडांची बेसुमार कत्तल होत आहे आणि लोक उद्योग धंद्यासाठी किंवा कारखानदारीसाठी जंगलतोड करत आहेत आणि तिथे मोठमोठे कारखाने व उद्योगधंदे उभे करून निसर्गाचे देखणे रूप बिघडवत आहेत. हे काम शेतकरी करत नसून मोठमोठे लोक जेणेकरून ज्यांच्याकडे अमाप संपत्ती व पैसा आहे असेच लोक जंगलतोड करत आहेत आणि तिथे मोठमोठ्या संस्था, उद्योगधंदे व कारखाने उभे करून निसर्गाचा नायनाट करत आहेत. शासन सुद्धा अशा लोकांना समर्थन देत आहे. निसर्गाचा विचार करायला कोणीही तयार नाही. शेतकरी जगला तरच हे सुंदर जग टिकेल, कारण या जगाला पोसण्याची ताकद फक्त आणि फक्त शेतकऱ्यांमध्येच आहे आणि हा शेतकरी जर आज आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवत असेल तर खरंच लोकशाही प्रधान देशासाठी ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. मायबाप सरकार शेतकऱ्यांचा जराही विचार करायला तयार नाही. त्यांच्या शेतातील नुकसान झालेल्या मालाला योग्य नुकसान भरपाई द्यायला तयार नाही. शेतकऱ्यांचा विचार न करता गलेलठ्ठ पगारी असणाऱ्या शासकीय नोकरदारांचा व प्रशासनातील राजकीय पुढाऱ्यांचा विचार करण्यास शासन मश्गुल झाले आहे. हल्ली मराठवाडा किंवा महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात अतिवृष्टी झाली आहे. सोयाबीन, मुग, उडीद व कापूस पावसाच्या माऱ्याने हिरावून नेले आहे. शेतीला तळ्याचे स्वरूप आले आहे. शेतात पाणी साचल्याने संपूर्ण पीक जळून खाक होण्याच्या मार्गावर आहे. आता शेतकऱ्यांपुढे जगावे की मरावे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना शेतात चांगले पीक आले तर घरी सुखाची झोप लागते आणि शेतातील पीक अतिवृष्टीच्या व निसर्गाच्या कचाट्यात सापडले तर शेतकरी हवालदिल होऊन चिंताग्रस्त झालेला असतो. त्याला सुखाची झोप येत नाही ना कुठे मन लागत नाही. हीच परिस्थिती सध्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर ओढवली आहे. सध्या महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील शेतकरी निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. नाहीतर शेतकरी आत्महत्या वाढत जातील, शेतकरी शेती पिकवणे थांबवतील आणि शेतकऱ्यांवाचून या जगाला उपाशी मरावे लागेल, एवढे मात्र नक्की म्हणून शासनाला माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना सुखी करावे हेच शेतकरी तुम्हाला उद्या आणखीन सत्तेवर बसवल्याशिवाय राहणार नाहीत एवढे मात्र नक्की...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# पर्यटन; सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ

जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे. पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही. सरकारने स्वत:चे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा गौरव आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे.भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला)पर्यटनसिटीम्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे.कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे.यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल.या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्पकेला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल.त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते.परंतु जानेवारी २०२० पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना ग्रहण लावल्याचे आपण पहाले.अतीथी देव भव म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी चीन विषेला साप झाला आहे.जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात. कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा,आकांक्षा,नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जालना शहरात स्वस्थ नारी - सशक्त परिवार व नमो नेत्र संजीवनी अभियानाचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिका आणि लायन्स क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली स्वस्थ नारी - सशक्त परिवार आणि नमो नेत्र संजीवनी मोफत नेत्र तपासणी अभियानाचे शिबीर पार पडले. हे शिबीर शहरातील कादराबाद पाणीवेस येथील पाकणीकर हॉस्पिटल, पोलास गल्ली येथे आयोजित करण्यात आले होते.

सदर शिबिराचे उदघाटन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम आणि लायन्स क्लबचे श्री. जयपुरिया यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. गिरीश पाकणीकर, डॉ. सौ. पाकणीकर, श्री. खरात, डॉ. संगीता राजे-देशमुख, डॉ. दीपक भालेराव यांच्यासह महानगरपालिकेच्या शहरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका व कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विशेषतः गरोदर मातांची तपासणी प्राधान्याने करण्यात आली. एकूण २५० महिलांची आरोग्य तपासणी झाली. त्यापैकी ८७ महिलांची रक्त तपासणी (रक्तदाब व रक्तशर्करा तपासणीसह) करण्यात आली. क्षयरोग तपासणी देखील शिबिरात करण्यात आली.

नेत्र तपासणी अंतर्गतः १५० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ८ रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले. डोळ्यांचे नंबर झालेल्या गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप महानगरपालिका मार्फत करण्यात येणार आहे.

या शिबिरामुळे जालना शहरातील नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीची संधी मिळाली.




ग्रामीण व शहरी भागात महिलांचे आरोग्य, नेत्ररोग आणि क्षयरोग तपासणीसारख्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत असल्याने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. मातृ आरोग्य तपासणीमुळे गर्भावस्थेत उद्भवणारे आजार वेळेत शोधून काढता येतात. रक्तदाब, मधुमेह आणि क्षयरोग यांसारखे आजार प्रारंभी निदान झाल्यास गंभीर परिणाम टाळता येतात. मोतीबिंदूसारख्या नेत्रविकारांचे निदान आणि तात्काळ उपचारांमुळे दृष्टी गमावण्याचा धोका कमी होतो.

जालना शहरात झालेले हे आरोग्य शिबिर हे केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता नागरिकांना आरोग्याविषयी जागरूक करण्याचे माध्यम ठरले. स्वस्थ नारी - सशक्त परिवार हा संदेश महिलांच्या आरोग्यदायी जीवनाशी जोडलेला आहे तर नमो नेत्र संजीवनी अभियानामुळे सर्वसामान्यांना दर्जेदार नेत्र तपासणी आणि मोफत सुविधा उपलब्ध होतात.

अशा उपक्रमांमुळे आरोग्य सेवा केवळ रुग्णालयापुरती मर्यादित न राहता जनतेच्या दारी पोहोचते, हीच या शिबिराची खरी जमेची बाजू आहे.

# अनुदान घोटाळ्यात कोतवाल व एजंटांना अटक; २४.९० कोटींचा अपहार उघड

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानात मोठा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात तब्बल रु २४,९०,७७,८११/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे समोर आले असून आर्थिक गुन्हे शाखा जालन्याने तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या अनुदान घोटाळ्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ नोंदविण्यात आला आहे. संबंधित गुन्हा कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) भारतीय दंड संहिता (इछ्ड) सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

यापूर्वी सहाय्यक महसूल अधिकारी सुशिलकुमार दिनकर जाधव यांना अटक झाली असून ते सध्या जिल्हा कारागृहात आहेत. त्यानंतर शिवाजी श्रीधर ढालके (तलाठी, अंबड तहसील कार्यालय) यास १९ सप्टेंबर रोजी अटक झाली असून तो सध्या पोलिस कोठडीत आहे.

चौकशीत उघड झाले की, ढालके यांनी स्वतःच्या मूळ गावी (उमरी बाजार, ता. दर्यापूर, जि. अमरावती) येथील ५० पेक्षा जास्त लोकांची बोगस नावे अंबड तालुक्यातील दाढेगाव येथे टाकून शासनाकडून लाखो रुपयांचा आर्थिक लाभ मिळवला.

चौकशीदरम्यान तलाठ्यांना मदत करणाऱ्या एजंट व कोतवालांचा सहभागही उघड झाला. त्यामुळे मनोज शेषराव उघडे (कोतवाल, दाढेगाव, ता. अंबड) साहेबराव उत्तमराव तुपे (खाजगी सहाय्यक, रा. पिठोरी सिरसगाव, ता. अंबड) यांना आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. गुरुवारी (दि. २५) न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

तलाठ्यांनी अनुदान वितरणासाठी बोगस नावे यादीत समाविष्ट करण्यासाठी एजंट व सहाय्यकांची मदत घेतली. या बदल्यात एजंट व सहाय्यकांना टक्केवारीनुसार हिस्सा देण्यात येत होता. शेतकऱ्यांसाठी आलेले कोट्यवधी रुपयांचे अनुदान अशा पद्धतीने बोगस नावांद्वारे अपहार करण्यात आला.

या प्रकरणातील उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. आणखी बोगस लाभार्थ्यांची नावे व संबंधितांचा सहभाग तपासाअंती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ही कारवाई अजयकुमार बन्सल, पोलीस अधीक्षक जालना, आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, सिद्धार्थ माने, प्रभारी उपअधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर पथकाचे नेतृत्व मिथुन घुगे, स.पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा यांनी केले. या कामगिरीत पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर तसेच महिला अंमलदार जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांचा समावेश होता.

### सिद्धार्थ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामीण रुग्णालय जाफराबाद यांचा संयुक्त उपक्रम

# आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** सिद्धार्थ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग , जाफराबाद आणि ग्रामीण रुग्णालय, जाफराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

हे शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. तु. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर एस पाटील उपस्थित होते.

या शिबिरात स्त्रीरोग, रक्तदाब, सिकल सेल निमिया, हिमोग्लोबिन, उंची- वजन, डोळे व दात तपासणी आदी आरोग्य तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस व आरोग्य कर्मचारी यांनी तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन दिले. विद्यार्थिनींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिवाजी जगतवाड प्रा. डॉ. प्रदीप मिसाळ, व प्रा. डॉ. शरद मोहरीर, प्रा. डॉ. राहुल मोरे प्रा. अनिल वैद्य, प्रा. श्रीमती सरिता मनियार प्रा. श्रीमती मनीषा मोहिते यांचे सहकार्य लाभले

### पावसाच्या शक्यतेनंतर आमदार अर्जुन खोतकर यांनी केली मोती तलावाची पाहणी

# तात्काळ उपाययोजनाबाबत अधिकाऱ्यांना सूचना

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने मोती तलाव ओसंडून वाहू लागल्याने शहरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. तलावातील पाणी नागरी वसाहतीत शिरल्याने संजय नगर, भवानी नगर, मिल्लत नगर, दुःखी नगर यांसारख्या परिसरातील अनेक घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले. त्यामुळे शेकडो कुटुंबांचे जीवनमान विस्कळीत झाले.

पावसाच्या पाण्यामुळे घरातील जिवनावश्यक वस्तू, कपडे, धान्यसाठा, फर्निचर, घरगुती उपकरणे यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही घरांच्या भिंतींना भगदाड पडले, तर पाण्यामुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची वेळ आली. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला होता. यामुळे नागरीकांमध्ये मोठी भीती व अस्वस्थता निर्माण झाली.

**आमदार अर्जुन खोतकर यांची पाहणी**

या पार्श्वभूमीवर आज शुक्रवार, दिनांक २६ रोजी दुपारी आमदार अर्जुन खोतकर यांनी मोती तलाव परिसराची पाहणी केली. त्यांच्या सोबत महापालिकेच्या उपायुक्त गायकवाड मॅडम, अभियंता सय्यद सऊथ, स्वच्छता निरीक्षक पंडित पवार तसेच औद्योगिक वसाहत महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. खोतकर यांनी तलावाच्या परिसराची पाहणी करून अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली आणि संभाव्य धोके समजून घेतले.

**अधिकाऱ्यांना सूचना**

आमदार खोतकर यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, पुढील काही दिवसांत पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत जर तलावाचे पाणी तात्काळ सांडव्याद्वारे सोडण्यात आले नाही, तर वरील नागरी वस्त्यांमध्ये मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे तातडीने



पाण्याचा विसर्ग करण्याचा मार्ग मोकळा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. खोतकर यांच्या सूचनेनुसार तातडीने कारवाई करण्यात आली आणि मोती तलावातील पाणी सांडव्याद्वारे दर्शना हॉटेल भागातून विसर्ग करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

गेल्या आठवड्यातील पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे जालन्यातील नागरिक अजूनही विस्कळीत आयुष्य जगत आहेत. मात्र आमदार खोतकर यांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासन जागे झाले असून तात्पुरत्या उपाययोजना सुरू झाल्या आहेत. तरीही स्थायी उपाययोजना न झाल्यास भविष्यातील पावसाळ्यात हीच परिस्थिती पुन्हा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही

### जालन्यात जयपूर महसूल मंडळ पंचनाम्यातुन वगळले; शेतकरी आक्रमक

# संपूर्ण मंठा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हय़ातल्या मंठा तालुक्यातील जयपूर महसूल मंडळ पंचनाम्यातुन वगळण्यात आल्याने जयपूर मंडळतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढून जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांच्या घोषणेने परिसर दणाणून गेला. जिल्हय़ातील अतिवृष्टीमुळे शेतकर्यांचे हाल झाले शेत पिक आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले रात्र दिवस शेत शिवारात कष्ट करणारा शेतकरी संकटात सापडला असून शेतकऱ्यांवर उपाषी राहण्याची वेळ आली आहे तर जयपूर महसूल मंडळात पर्जन्यमापक यंत्र नसल्यामुळे या महसूल मंडळाला पंचनाम्यातुन वगळण्यात अलं दरम्यान मंठा तालुक्यातल्या जयपूर महसूल मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसवून नुकसानग्रस्त शेती चे पंचनामे करून शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान द्यावे या मागणीसाठी शेतकर्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना दुर्लक्ष केले जात असल्याने राज्यभरातील शेतकरी आक्रमक पाहायला मिळत आहे तर संपूर्ण मंठा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी जयपुर च्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनद्वारे केली आहे.

यावेळी जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की जयपूर व जयपूर महसुल मंडळ अंतर्गत शिवनगिरी, बेलोरा, एरंडेश्वर, कोकरसा, दहा, माळेगाव, केहाळवडगाव, अंभोरा-महोरा, पोखरी इत्यादी गावात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात म्हणजे दिनांक १३ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. सदरील कालावधीत मोठ्या प्रमाणात ढगफुटीसदृश्य पाऊस होवून शेतकऱ्यांच्या शेतातील पिके मातीसह वाहून गेली आहेत. काही ठिकाणाच्या जमीनी देखील खरडून गेल्या आहेत.

आमच्या जयपुर मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आलेले नाही आणि पांगरी गोसावी या मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आले आहे परंतू त्या गावाचा आणि आमच्या गावाचे अंतर जवळपास १५ ते २० किमी अंतर आहे आणि तळणी सर्कल जे संपूर्ण ओला दुष्काळ आहे त्यामुळे तळणी मंडळाच्या धर्तीवर आमच्या जयपूर सर्कलचा देखील ओला दुष्काळ म्हणून घोषीत करण्यात यावे.

जयपुर सर्कल मधील बहुतांश जमीनीचे मोठे नुकसान झाले आहे. संपूर्ण गावात तांड्यात पाणी शिरले आहे. बहुतांश नागरीकांच्या घरात जमा झाल्यामुळे तर काही नागरीकांचे अनावरे देखील दगावली आहेत.

यामध्ये सोयाबीन, कापूस, तुर, उडिव, मुग या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जमीनीचे मोलेया प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यानंतर देखील जयपुर सर्कल मध्ये परिसरातील अनेक गावात (तांड्यात सतत अतिवृष्टी होवून शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे मुकसान झाले आहे परंतू या बाबत शासन स्तरावसम अद्यापही पंचनामा करण्यात आलेला नाही.

तेंव्हा आपणास नम्र विनंती की, जयपूर सर्कल (महसुल मंडळ) ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा. या बाबत पंचनाम्या सारख्या जाचक अटी घालण्यात येवू नयेत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे यावेळी विष्णुपंत काकडे, दत्तात्रय काकडे, नारायण भाऊ , नाथराव सस्ते, काशिनाथ गुरु काकडे, रामेश्वर काकडे, संदीप काकडे,, चंद्रभान काकडे, प्रल्हाद आप्पा, रामभाऊ सस्ते, बाबासाहेब काकडे, बाळासाहेब काकडे यांच्यासह शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..



# मराठवाडा साहित्य परिषदचा ८२ वा वर्धापनदिन जालन्यात आयोजित

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा साहित्य परिषदेचा ८२ वा वर्धापनदिन रविवार, २८ सप्टेंबर २०२५ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ सकाळी १०:०० वाजता जे. ई. एस. महाविद्यालयाच्या सभागृहात सुरु होईल.

वर्धापनदिन समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील राहतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी प्रा. इंद्रजीत भालेराव, परभणी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. समारंभात जालन्यातील ज्येष्ठ कथा-कादंबरीकार श्रीमती रेखा बैजल यांचा सत्कार करण्यात येणार असून, प्राचार्य डॉ. रामलाल अग्रवाल आणि डॉ. गणेश अग्निहोत्री यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

समारंभानंतर दुपारी २:०० ते ४:३० वाजता जालना जिल्ह्यातील मान्यवर व नवोदित कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कविसंमेलनाचे अध्यक्ष राम गायकवाड राहतील, तर सहभागींमध्ये कैलास भाले, रत्नमाला मोहिते, विठ्ठलराव काष्टे, ज्योती धर्माधिकारी, कल्याणी देशमुख, सत्यशीला तौर, सदाशिव कमळकर, शिवाजीराव कायंदे, प्रभाकर शेळके, बसवराज कोरे, रंगनाथ खेडेकर, श्रीकांत गायकवाड, कविता बोरगावकर, लक्ष्मीकांत दाभाडकर, रमाकांत कुलकर्णी, विद्या दिवटे, राजेंद्र देशमुख, दीपक राखुंडे, उद्धव अदुडे, सुचिता कुलकर्णी, अशोक पाठक, अजय देसाई, राजाराम जाधव, कृष्णा आर्दड, गणेश कंटुले, प्रदीप देशमुख, सुरेश कायटे यांचा समावेश आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या जालना शाखेच्या वतीने रसिकांना वर्धापनदिन समारंभ व कविसंमेलनात उपस्थित राहून साहित्यिक परंपरेचा अनुभव घेण्याचे आवाहन अध्यक्ष, शाखा जालना - रवींद्र तौर, कार्यवाह, शाखा जालना - पंडितराव तडेगावकर, कार्यकारिणी सदस्य - संजीवनी तडेगावकर, सुभाष कोळकर, बाळासाहेब तनपुरे यांनी केले आहे.

# मॅजिक आयटीआय जालना इन्क्यूबेशन सेंटरच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवकांना उद्योजक होण्याची संधी - मंत्री मंगलप्रभात लोढा

## ई 'मॅजिक आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटर' चे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील युवकांच्या उद्योग विषयक कल्पनेनुसार आपला स्वतंत्र उद्योग सुरु करुन उद्योजक होण्यासाठी मॅजिक इन्क्यूबेशन सेंटरच्या माध्यमातून सुवर्णसंधी निर्माण झाली असल्याचे राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

येथील हुतात्मा जनार्दनमामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात सुरु करण्यात आलेल्या मॅजिक इन्क्युबेशन सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी श्री. लोढा हे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, कौशल्य विकास विभागाच्या विभागीय उपआयुक्त विद्या शितोळे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सहसंचालक पुरूषोत्तम देवतळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर आणि शासकीय आयटीआयचे प्राचार्य प्रविणकुमार उखळीकर, मॅजिक संचालक मंडळाचे आशिष गर्दे, रितेश मिश्रा, नितीन काबरा, सुनील रायठ्ठा, प्रसाद कोकिळ, केदार देशपांडे, प्रशांत देशपांडे, मिलिंद कांक, सुरेश तोडकर तसेच मॅजिकची यंग टीमचे यशराज पिट्टी आणि अनुज बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. लोढा पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरवून मॅजिक इन्क्युबेशन सेंटरच्या सहकार्याने कौशल्याधारित उद्योग सुरू करून आयडीया ते इन्कम टॅक्स धारकहा प्रवास साध्य करावा. आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना उद्योगामध्ये रूपांतरित करून त्या माध्यमातून स्वतःचे उत्पन्न वाढविणे व रोजगार निर्मिती करणे एवढ्यावरच न थांबता. त्यांनी आपले उत्पन्न वाढवून आयकरधारक होण्याची संधी या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. आई-वडिलांच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी युवक-युवतींनी नवकल्पना मांडून यशस्वी उद्योजक व व्यवसायिक बनावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास उपस्थित उमेदवारांशी संवाद साधून, आयटीआयमध्ये कोणते अभ्यासक्रम अपेक्षित आहेत याबाबत त्यांनी प्रत्यक्ष विचारणा केली. यावेळी उमेदवारांनी सुचविलेल्या ड्रोन ऑपरेटर, सोलार टेक्नीशियन, इलेक्ट्रिक व्हेइकल टेक्नीशियन, ब्युटी थेरपिस्ट आदी अभ्यासक्रम दि. ०८ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत हमखास रोजगार देणारे प्रशिक्षण म्हणून सुरू करण्याचे निर्देश व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागास त्यांनी यावेळी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील युवकांना मॅजिक सेंटरच्या माध्यमातून आपला स्वतःचा स्टार्टअप सुरु करण्याची संधी निर्माण झाली आहे. अशी संधी देणारा हा राज्यातील पहिला प्रकल्प आहे. या मॅजिक सेंटरमुळे भविष्यात खुप चांगले परिणाम आपणांस पाहण्यास मिळणार आहे. उद्योग उभारण्यासाठी लागणारे डिझाईन आणि भांडवल यासाठीचे मार्गदर्शन व मदन या सेंटरद्वारे उपलब्ध झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नवसंकल्पनाधारकांनी मॅजिक इन्क्युबेशन सेंटरमध्ये आपली नोंदणी करून, यशस्वी उद्योजक बनावे. तसेच ग्रामीण भागातील नवसंकल्पनाधारक युवक-युवतींसाठी तालुकास्तरावर मॅजिकप्रमाणे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कौशल्य विकास विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदीप डोळे, दिपक पालवे, अमर तुपे तसेच मॅजिकचे अधिकारी राघवेंद्र कुलकर्णी, शशीकांत तिवारी, प्रिती कामठे, कृष्णा टेकाळे, आयेशा मन्सुरी, मिरा चितांमणी, गौरव पटेल यांनी सहकार्य घेतले. यावेळी कार्यक्रमास येथील जिल्ह्यातील उद्योजक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी-कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते स्त्री दुर्गा जागर मंडळाची आरती

## शेतकऱ्यांवरील संकट दूर करण्याची प्रार्थना



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सामाजिक कार्यकर्त्या नंदा पवार यांच्या स्त्री दुर्गा जागर मंडळाची गुरूवारी उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

शिवनगर येथील चांभारकुंड परिसरात नंदा पवार यांनी स्थापलेले या मंडळाचे आयोजन भक्तिभावाने पार पडले. या वेळी गोयल यांनी देवी यल्लमा समोर अतिवृष्टीमुळे शेतमालाचे नुकसान झाले आहे, शेतकरी संकटात आहेत, यापुढे शेतकऱ्यांवरील संकट टळो व त्यांना बरकत मिळो, जनतेचे आरोग्य निरोगी राहो असे साकडे घातले. यावेळी ढोर समाजाचे जेष्ठ नेते मुरलीधर चांदोडे यांनी गोयल यांचा सत्कार केला. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या नंदा ताई पवार, गणेश चांदोडे, सुरज यलगंठवार, सचिन क्षिरसागर, गजानन ठोंबरे, कुलदीप चांदोडे, समाधान खाडे, राजकुमार पोळ, गणेश बागडे, सचिन जेवाळ, लक्ष्मण भोरे, आकाश चांदोडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला आणि उपस्थितांनी देवीस सामूहिक प्रार्थना करून शेतकऱ्यांसाठी कल्याणाची इच्छा व्यक्त केली.

## विकास महामंडळाच्या थकीत कर्ज लाभार्थ्यांना व्याज रकमेत ५० टक्के सवलत

**जालना -** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यात बाबतची एकरक्कमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थींनी सदर योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या जालना जिल्हा कार्यालयाशी (०२४८२ -२२३४२०) संबंधितांनी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. एम. राठोड यांनी केले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.